कार्यकारी अभियंता / ग-उत्तर विभाग यांचे कार्यालय,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
सोनावाला इमारत, शं. आ. पालव मार्ग, शिंदेवाडी,
दादर , मुंबई - ४०० ०१४, दुरध्वनी क्र. ०२२-२४१८१६९१

**जा.क्र. काअ/ग-उत्तर/उवि ३/DIS- /२०२५ दिनांक :- २७ /०५/२०२५**

**म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ७७(ब) अंतर्गत धोक्याचे सूचनापत्र**

**प्रति,**

| | | |
|---|---|---|
| **सर्व भाडेकरु/ रहिवाशी व इमारतीचे मालक, उपकर क्र. GN-4878(1), इमारत क्र. ८-८सी, २६-२६-एफ, कॉर्नर चेम्बर, शिवाजी पार्क रस्ता क्र. ५, दादर, मुंबई** | Matwad Madressa & Masjid Trust, 217, Sadak Family, Matwad, Post. Kharel, Gandevi, Navsari, Gujrat-396430 | Mohamed Ebrahim Issat & oth,C/o Haji Fakir Maniyar, Maniyar Stores, 2220,Ibrahim, Rohmtula Road, Mumbai, Maharashtra 400003 (As Per Repair Cess Register) |
| Yusuf Ibrahim Sedat & Others,The Matwad Madressa & Masjid Trust, C/o S.K. Ismail Khan & Bros,72/74, Al-madina Bldg, 1st Floor, Grant Road, X-Lane, Mumbai-07 | Yusuf Ibrahim Sedat & Others, The Matwad Madressa & Masjid Trust,Plot no.198, Shivaji Park, Road No.5, Off Gopi Tank Road, Mahim, Road, Mumbai-16. | |

**विषय** :- **उपकर क्र. GN-4878(1), इमारत क्र. ८-८सी, २६-२६-एफ, कॉर्नर चेम्बर, शिवाजी पार्क रस्ता क्र. ५, दादर, मुंबई या इमारतीच्या धोकादायक संरचनात्मक स्थितीबाबत इशारा सूचना**

**संदर्भ** :- 1) M/s. Structera Engineering LLP श्री. सौरभ पेडणेकर यांनी या कार्यालयास सादर केलेला संरचनात्मक परिक्षण अहवाल.
2) या कार्यालयाचे सर्वसाधारण निष्कासन सुचना पत्र क्र. DIS-७५२१०१ दि. ०९.०५.२०२५

**महोदय/ महोदया,**

या कार्यालयातर्फे विषयांकित इमारतीचे M/s. Structera Engineering LLP श्री. सौरभ पेडणेकर यांनी संरचनात्मक परिक्षण केले आहे. त्याअनुषंगाने M/s. Structera Engineering LLP श्री. सौरभ पेडणेकर यांनी संदर्भाधिन पत्र क्र. १ अन्वये संरचनात्मक परिक्षण अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने विषयांकित इमारतीची वर्गवारी **C-१** म्हणजेच To be Demolished अशी नमूद करण्यात आली आहे. सदर अहवालाच्या आधारे, इमारत धोकादायक असल्याची या कार्यालयामार्फत निश्‍चिती करण्यात आली. सबब आपणास या सूचना पत्रान्वये विषयांकित इमारतीच्या धोकादायक संरचनात्मक स्थितीबाबत इशारा देण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी आपणास सूचित करण्यात येते कि, विषयांकित इमारतीत वास्तव्य करणे धोकादायक असून आपण आपली सदनिका तातडीने रिक्त करुन इमारत निष्कासित करावी. आपणास पर्यायी निवासस्थानासाठी म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळ्याची आवश्यकता असल्यास आपण या कार्यालयास खालील नमूद कागदपत्रांच्या मूळ प्रती व त्यांच्या छायांकित प्रतींचे दोन संच तसेच सोबत आपली पासपोर्ट आकाराची ०४ छायाचित्रे या कार्यालयास सादर करावीत, जेणेकरुन आपणास संक्रमण शिबीरातील गाळा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया सुरु करणे या कार्यालयास शक्य होईल.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| १. | भाडेपावती - दि.१३.०६.१९९६ पूर्वीची व सध्याची | सदर कागदपत्रे विषयांकित इमारतीत आपण वास्तव्यास असलेल्या गाळ्याशी संबंधित असणे आवश्यक आहे. |
| २. | शिधापत्रिका - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे | |
| ३. | निवडणूक ओळखपत्र - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे | |
| ४. | विद्युत देयक - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे व सध्याचे | |
| ५. | दुरध्वनी देयक - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे व सध्याचे | |
| ६. | आधारकार्ड व पॅनकार्ड | |
| ७. | पारपत्र / वाहन चालक परवाना, इत्यादी. | |
| ८. | इमारतीतील वास्तव्याबाबतचे इतर पुरावे | |

उपरोल्लेखित बाबींची पूर्तता करुन आपण आपला गाळा निष्कासित करुन इतरत्र स्थलांतरीत झाला नाहीत व इमारतीत आपले वास्तव्य सुरु ठेवलेत आणि त्या कालावधीत इमारतीत पडझडीने अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी झाल्यास, त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल याची आपण **गांभिर्याने** नोंद घ्यावी.

**आपला विश्वासू ,**

**Signed by Amit Anil Kadam**
**Date: 27-05-2025 13:51:07**
**कार्यकारी अभियंता**
**ग-उत्तर विभाग / मुं.इ.दु व पु.मंडळ**

**प्रत,**

- मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव सविनय सादर.DIS-
- उपमुख्य अभियंता (परिमंडळ-४) / मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव सादर. DIS-
- उपमुख्य अधिकारी (सं.गा.) / मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव सस्नेह अग्रेषित. DIS-
- सहाय्यक आयुक्त, ग-उत्तर विभाग, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांस माहितीस्तव सस्नेह अग्रेषित. DIS-
- मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, शिवाजी पार्क पोलिस स्टेशन, दादर, मुंबई यांस माहितीस्तव रवाना. DIS-
- कार्यकारी अभियंता (इ व का), ग- उत्तर, मुंबई महानगरपालिका, खोली क्र. ३९, पहिला मजला, हरिशचंद्र येवले रस्ता, दादर (प), मुंबई - ४०००२८ यांस माहितीस्तव रवाना. DIS-
- वरिष्ठ अग्निशमन अधिकारी, ग-उत्तर अग्निशमन केंद्र, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांस माहितीस्तव रवाना. DIS-
- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी/ प्राधिकरण , गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव तथा म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकामी रवाना. DIS-
- मुख्य जनसंपर्क अधिकारी/ प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव तथा सदर सूचनापत्र मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेकामी रवाना. DIS-
- इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविणेसाठी DIS-
  - इमारतीच्या घरमालकाची नोंद या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या अनुषंगाने नमूद करण्यात आलेली आहे. तथापि सदर नोंदीव्यतिरिक्त इमारतीच्या मालकीचे अन्य दावेदार असल्यास त्यांनी व इमारतीच्या सर्व भाडेकरु/ रहिवाशी यांनी सदर धोक्याच्या सूचनेची दखल घेणेकामी या नोटीशीच्या प्रती पंचनाम्यासहित इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविण्यात येत आहेत.